# अनुक्रमणिका (Index)



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | HRM and Its Aspect of Welfare Facilities in Sugar Industries In Marathwada region & Western Maharashtra | Dr. Amar Annarao Gadade | ५ |
| २ | Division of labour in Domesticwork in North india | Rathod Bhimrao Jaisu | १० |
| ३ | Procedure of Trading in Stock Exchange | Dr. Nitin Bhatu Songirkar | १३ |
| ४ | Structural Problems in Transhlation Jyotirao Phule's Akhandadi Kavvya | Dr. Raut Sunil Raosaheb | १८ |
| ५ | 'रायगडाला जेंव्हा जाग येते' या नाटकाची चिकित्सा | प्रा. दिलीप महादू कोने | २२ |
| ६ | मराठी साहित्यामधील कृषीनिष्ठ जाणिवा | डॉ. संजय शामराव पाटोळे | २६ |
| ७ | स्त्रीवादी साहित्याभ्यास | सविता बालासाहेब कदम | ३२ |
| ८ | महात्मा गांधीजींचा ग्रामीण विकास विषयक दृष्टीकोन | प्रा. डॉ. जे.बी. कांगणे | ३६ |
| ९ | स्त्रीवादी जाणिवांचा समीक्षात्मक विचार | सविता बालासाहेब कदम | ४० |
| १० | भारतातील निवडणुकीचे बदलते स्वरुप व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी संबंधित तरतूदींचे अध्ययन | प्रा. डॉ. सुधाकर जावळे | ४३ |
| ११ | भारतीय राजकारणावरील जातीच्या प्रभावाचे अध्ययन | प्रा. महेश पा. कामडी | ४९ |
| १२ | महिला सक्षमीकरण संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार | प्रा. डॉ. सुनिता शंकरराव कुरूडे | ५४ |
| १३ | वैदिक पर्यावरा आणि आजची स्थिती | प्रा. सौ. संजीवनी नेरकर | ५८ |
| १४ | आधुनिक औद्योगिक क्षेत्रातील सामाजिक पर्यावरणाचे स्थान, प्रकार, समस्या आणि उपाय | प्रा. डॉ. दिगांबर समर्थ | ६२ |
| १५ | महाराष्ट्र व केरळ राज्यांच्या प्राथमिक शिक्षणावरील खर्चाची तुलनात्मक प्रवृत्ती | डॉ. मनिषा बाबुराव सुरासे | ६७ |
| १६ | मानवी जीवनात मादक पदार्थांचे दुष्परिणाम व व्यायाम याचे उपयोग | प्रा. विजय जाहेर | ७० |
| १७ | वैश्विकरण एवं भूमंडलीकरण से भाषा, साहित्य तथा संस्कृती में आगत परिवर्तन | प्रा.डॉ. गिरी डी.व्ही. | ७२ |
| १८ | वीरयोध्दा छत्रपति शिवाजी : भूषण के काव्य में | प्रा. डॉ. जयश्री वाडेकर | ७४ |
| १९ | शिकंजे का दर्द आत्मकथा में नारी उत्पीडन | डॉ. पुष्पा गोविंदराव गायकवाड | ७७ |
| २० | लोक उपासकांचे रुपक व मध्ययुगीन भारुड यांच्यातील परस्पर संबंध | सहा. प्राध्यापक अंकुश काळे | ८२ |
| २१ | जेनेंद्र कुमार का उपन्यास साहित्य : एक अध्ययन | डॉ. पठाण ए.एम. | ८७ |
| २२ | कौटुंबिक हिंसाचार कायदा -२००५ | डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे | ९० |
| २३ | सीमावर्ती भाषिक संस्कृती | डॉ. विठ्ठल हरिभाऊ जबाले | ९३ |



A.V. Education Society's Degloor College, Degloor * Dist.Nanded *

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

# सीमावर्ती भाषिक संस्कृती

**डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले**
प्रमुख, मराठी विभाग,
देगलूर महाविद्यालय देगलूर जि. नांदेड

लोकवाङ्मय हे लोकसंस्कृतीचे शब्दरुप होय. मौखिक परंपरेने चालत येणाऱ्या लोककथा, दंतकथा, मिथके, लोकगीत, लोकनाट्य, म्हणी, वाक्प्रचार, रुढी, परंपरा, समजुती इत्यादी घटकातून लोकसंस्कृतीचा आविष्कार घडतो. हे लोकवाङ्मय खेड्यापाड्यातील अशिक्षित लोकांनी निर्माण केलेले आहेत. शहरात राहणारे पण लोकपरंपरा जोपासणारे लोकवाङ्मय जपतात. पण खऱ्या अर्थाने ती लोकसंस्कृती ग्रामीण भागातच शोधता येते.

नांदेड जिल्ह्यातील देगलूर हा तेलंगणा आणि कर्नाटक या सीमालगतची तालुका. या परिसरातील बोलीभाषा निश्चितच वेगळी दिसून येते. येथील भाषा लेखन आणि मौखिक व्यवहार पातळीवर संवाद आणि निवेदनासाठी तेलगू मिश्रित मराठी, कन्नड मिश्रित मराठी प्रचलित असल्याचे आढळून येते. या संमिश्र बोलीभाषेचे पडसाद म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, विधीगीते, लोकगीते यावर पडलेले दिसतात.

देगलूर तालुक्यातील गीतांची भाषा ही ऐश्वर्यसंपन्न आहे. गीतात येणारे शब्द हे दैनंदिन रोजच्या व्यवहारातले आहेत. त्यामुळे श्रोत्यांशी सहजच एकरुपता साधता येते. ते श्रोत्यांना चटकन आकर्षित करतात. बोलीभाषेतील वाक्प्रयोग, शब्दप्रयोग, म्हणी, उखाणे व संबोधने, संवादात्मकता इत्यादी भाषेचे विविध अंग या गीतात पदोपदी अनुभवास येतात. शब्दांची योजना, रचना, यमक, अलंकार, प्रतीक, प्रतिमा, रुपक इत्यादी भाषिक सामर्थ्यस्थळे गीतातून प्रत्ययाला येतात. या गीतातील भाषा ओघवती, लालित्यपूर्ण असते. श्रोत्यांशी जवळिक साधण्याचे सर्व गुण या भाषासंपन्नतेत आढळतात.

**लोकगीतातील भाषावैभव :**

बोलीभाषा आणि गीते याचा निकटचा अनुबंध आहे. ही गीते लोकजीवनातून आविष्कृत होत असल्याने लोकभाषेचा अर्थात बोलीभाषेचा प्रभाव या गीतावर दिसून येतो. ही गीते विशिष्ट बोलीतच आहेत. प्रमाण भाषेच्या निकष या गीतात तंतातंत पालन करण्याचे बंधन नसते. बोलीभाषेततन गीताविष्कार होत असल्याने अस्सल जीवनाचा आनंद या त्यातून घेता येते. ही गीते सर्वसामान्याच्या ह्रदयाला स्पर्श करतात. बोलीभाषेतील शब्द लोकगीतातील चैतन्य निर्माण करतात. म्हणून लोकजीवनात नैसर्गिकपणे जीवंतपणा प्राप्त होतो आणि त्यामुळे लोकगीतांना एक डौलदारपणा प्राप्त होतो. असेच एक भूलई गीत उदाहरणादाखल पाहता येते.

कृष्णा मी देते रे देते गाडा
इथंच खेळ धडधडा
नको जाऊ भाईरी
कृष्णा मी देते रे देते
दही-भात लिंबू
इथच जराशी थांब
नको जाऊ भाईरी

वरील गीत बायका भुलई खेळत असताना आपल्या बाळाला कृष्ण समजून त्याला खेळण्यासाठी दिलेल्या साधनांचे वर्णन करतात. बाहेर आपलं बाळ जाऊ नये यासाठी चाललेली आईची धडपड येथे दिसून येते. या गीतात आलेला प्रत्येक शब्द दैनंदिन व्यवहारातील आहे. त्यामुळे हे गीत आत्मीयता निर्माण करते. ज्यातून अर्थपूर्ण असा नादमधूर गोडवा तयार होतो. हे बोलीचे सामर्थ्य प्रत्ययाला येते.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

**सीमावर्ती भागातील गीतातील प्रतीके** :

लोकगीतातील प्रतिकांची निर्मिती ही मानवी मनाची सतत चालणारी नैसर्गिक क्रिया समजली जाते. ही प्रतिके अनेक लोकगीतातून पाहवयास मिळतात.

औरंगी घोडा चौरंगी गुंफिला
तेही घोडा गंगीया थडी गंगीया थडी
आमच्या घरीर रामय्या सोनार
त्यानं घडविला मंगळसुत्राचा जोड
लेव लेव सविता किसन भ्रतार

वरील गीतातून औरंगी घोडा, रामय्या सोनार, मंगळसूत्र , जोडवे अशा प्रकारची प्रतिके आलेले दिसतात. अशा प्रकारची प्रतीके सीमावर्ती लोकगीतातून संस्कृती, इतिहास, धर्म यांचे स्मृतिसंपुटातील महत्त्व विशद करतात. कुंकवाचा धनी, राजपद, बळीचे राज्य, गंगाथडीचा राजा, गौरी, सीता, राम इत्यादी प्रतीके या परिसरातील भाषावैभव प्रकट करतात.

**सीमावर्ती परिसरामधील लोकगीतातील प्रतिमा :**

अबोध मनाची क्रिया भाषेच्या स्तरावर पकडण्याचे कौशल्य प्रतिमामधून आश्चर्यकारक पध्दतीने होत असते. लोकशिक्षणातील प्रभावी संस्करण लोकगीतातील प्रतिमांच्या माध्यमातून केले जाते. सीमावर्ती परिसर हा वेगवेगळ्या संस्कृतीशी जोडला गेलेला असल्यामुळे सीमावर्ती लोकगीतातून अशा प्रतिमा आलेल्या आहेत.

जिरु मिरुची एक वाटी
पल रेशमाच्या गाठी
जो जो रे रामचंद्रा
तुला लागो निद्रा
जो जो रे रामचंद्रा

वरील गीतातून श्रीरामास चंद्राची, रेशमाच्या गाठी अशा प्रतिमा योजलेल्या आहेत. अशा विविध देवदेवतांच्या प्रतिमा येथील लोकगीतांमधून आलेल्या दिसतात.

**व्यवहारोपयोगी मराठी - तेलगू सादृश्य / मिश्रित शब्द** :

तेलगू - मराठी भाषिक अनुबंध शोधताना देगलूर परिसरामध्ये शब्दकळा सारखी दिसते. तसेच अल्प प्रमाणात भाषिक संक्रमण घडल्याचे आढळते. किंवा व्यवहारिक पातळीवर सामान्यता सरमिसळ आढळते. अशी शब्दकळा वानगीदाखल पुढीलप्रमाणे पाहता येते. डबा - डब्बा, शिशी - शिसा बाटली, शेत - सेनु, सेब - सेप, कोंबडी - कोडी, कुत्रा- कुका, देव - देवूडू, बांगड्या - गोट, मोरी / नाली -मोरी, वीट - ईट, माती - मन्नु, दिवा- दिपम, मोळा/ खिळा- मोला, दोरी - दारम, अंगडे - अंगी, दुपट / पांघरणे- दुपाटे , पुस्तक - पुस्तकम, पाट - पिट्या भिन्न भाषिक उच्चार असलेले स्वतंत्र शब्दांचे वापर या परिसरात झालेले आढळते. तसेच समरूपी सादृश्य शब्दयोजना यापरिसरातील सामान्य व्यवहारात आढळतात. उदा. अंगुर, घडी, छत्री, पलंग, चेंडू , खांब, ग्लिास, पंखा, खटका,

**सीमावर्ती परिसरातील तेलगू - मराठी म्हणी :**

म्हणी म्हणजे अनुभवांच्या खाणी या संकल्पनेमधून सीमावर्ती लोकजीवनाचा मागोवा घेतला असता सरहद्दीवरील जीवनमान भाषासंपन्नतेचा प्रत्यय देते. म्हणी - वाक्प्रचारांची शिदोरी घेऊन यापरिसरातील लोकव्यवहार आनंददायी अभिव्यक्तीची प्रचिती देतात. अशा काही निवडक सुभाषितवजा लोकसंचितांमधील नोंदी पुढीलप्रमाणे -

१. चित्तम शिवडू मिदा भक्ती चेपूलमिदा
शिवावर चित्त चप्पलवर भक्ती

Degloor College Degloor Dist.Nanded

२. काशीना चेटूके रवथू देबल
फळे लागलेल्या झाडाला लोक दगडं मारतात.

३. काकी पिल्ला काकीके मुदा
कावळ्याचे काळे पिल्लू कावळ्याला प्रिय

४. इंटी दोगाकू देवूडू आईना पटा लेदू
घरच्या चोराला सापडत नाही देवाला

५. चुसी रा आन्टे कलशी आचीडू आंटा
पाहून ये म्हटले तर आला खोवून

६. उनांता माटा आन्टे कडपू पिल्लाकू कोपम
सत्य बोललेले सख्या आईला राग येतो

७. काट्या इरगदी पामू सावदी
काटी मोडली नाही पाहिजे अन् साप तर मेला पाहिजे

८. उन्नाडू उगादी लेनिाडू शिवरात्री - असलं तेव्हा दिवाळी, नसलं की शिमगा

९. अभाग्यडकू आकली एकवा निरभाग्यडकू निद्रा एकवा
अभाग्याला भूक , दुर्भाग्याला झोप जास्त

१०. मोरग्यडी कुका करवादी - भुकणारा कुत्रा चावत नाही (गर्जेल तो पडेल काय)

११. अविवेक स्नेहम कना विवेकमतोनी विरोधम मेलू
कपटी प्रेमापेक्षा विवेकाचा विरोध बरा

१२. आनमान तोनी पानम बोदंधी - शंकेने मनाला भिरूड

१३. आमा कडपू चुसतादी पेनलम जेब चुसतादी
आईची पोटाची खात्री बायकाची खिशाला कात्री

१४. अधिकम ऐते अमृत कुडा विषम ऐतदी
अती सेवने अमृतसुध्दा बनते विष

१५. आंदुते झुटू आनंदाकुंटे कालू
पोहचला तर शेंडी नाही पोहचला तर चरण ( झालात हिरो नाही तर झिरो)

१६. तिन्याडू मोगडू सोमू, पाड्यादी मिंड्यल पाटा
खायचे नवऱ्याचे गायचे प्रियकराचे ( खयचे कणगीला गायचे इरल्याला)

**कन्नड - मराठी भाषेतील म्हणींचा अनुबंध :**

१. बगलाग कूस इदू ऊर तुंबा हुडक्यादिळू - बगलेत मूल गावभर धांडोळा (काखेत कळसा गावाला वळसा )

२. अक्क सत्तरे अमावसे् निल्लदू - अण्ण सत्तरे हुण्णीमे निल्लदू बहीण मेली तर अमावस्या, भाऊ मेला तर पौर्णिमा थांबत नाही.

३. हरिबे इदष्टू कालू चाच - अंथरुण बघून पाय पसरावे

४. कैसरादरे बायी मसरु - हात चिखलात, दही तोंडात

५. कायकवे कैलास - कष्ट म्हणजे स्वर्ग

६. नानीय बाल डोकु - कुत्र्याचे शेपूट वाकडं ते वाकडं /कुत्ते की पूँछ तेढी

७. ताई कलीसिद बुध्दि सायुवतनका - आईची शिकवण आयुष्यभर पुरते

८. मूर्ती सणणदादरु कीर्ती दोडडरु - मूर्ती लहान कीर्ती महान

**निष्कर्ष व समारोप :**

सीमावर्ती परसरातील लोकजीवनामध्ये भाषिक संमिश्रता आढळते. तेलगू - मराठी आणि कन्नड - मराठी भाषिक अनुबंध अभ्यासक म्हणून विशेष प्रभावित करतो. लोकवाङ्मय जतन करणाऱ्या समुदायात बहुभाषिकता अनुभवास येते. म्हणी - सुभाषितवजा वचने, वाक्प्रचार, शब्दकळा, यांचा मुक्त वापर सरहद्दीवरील लोकवाङ्मय आणि लोकजीवन यामध्ये झालेला आहे. पारंपरिक लोकजीवनामधील सांस्कृतिक ठेवा भाषिक आदानप्रदान दर्शवितो. सरहद्दीवरील भागात भाषिक समन्वय लोकवाङ्मयातील घटकांमधून गडदपणे टिपलेला आहे. तेलगू - कन्नड भाषिक रसायन सीमावर्ती लोकवाङ्मयातील माधुर्य प्रतीत करते. सीमाभगातील लोकव्यवहाराला अधोरेखित करण्यासाठी लोकवङ्मय सहाय्यभूत ठरते.

अशाप्रकारे महाराष्ट्राच्या दक्षिणपूर्व भागातील नांदेड जिल्ह्याच्या दक्षिण टोकावरील आणि देगलूर शहर आणि तालुक्यामधील परंपरागत जीवनमान सामान्य अभ्यासकांना प्रभावित करते. या लोकजीवनातील लोकगीते, मौखिक वाङ्मयाधारे प्रस्तुत लेखाची मांडणी करण्यात आलेली आहे. यातील संदर्भ प्रत्यक्ष लोकव्यवहारामधून संकलित करण्यात आलेले आहेत. तसेच मुलाखतीद्वारे अवलोकन करून त्यांचे बहुभाषिक जाणकाराशी सल्लामसलत करून भावार्थ प्रकट करण्याचा प्रयास केलेला आहे. जागतिकीकरण, आधुनिकीकरण आणि महाजाल आणि संगणक क्रांतीच्या प्रभावात नष्ट होणाऱ्या या भाषिक लोकधनाला शब्दांकित करून अक्षर करण्याचा हा छोटासा प्रयत्न.

▣▣▣

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded